विभागीय सहायक भाषा संचालक, विभागीय कार्यालय,नवी मुंबई या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग

शासन आदेश क्रमांक:-भाअका-२०१८/प्र.क्र.३३/आस्था-२,
नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २२.१.२०१९

संदर्भ : १) वित्त विभाग,शासन निर्णय क्र.वेतन१३११/प्र.क्र.१७/सेवा-३, दि..२७.११.२०११.
२) शासन आदेश, समक्रमांक दि. २२.०५.२०१८.
३) भाषा संचालनालयाचे पत्र क्र.रापअ(नियुक्ती) २०१८/प्र.क्र.३१/२४७७/चौदा, दि. ०४.१०.२०१८.
४) भाषा संचालनालयाचा कार्यालयीन आदेश क्र.रापअ(नियुक्ती) २०१८/प्र.क्र.३१ /२७०२/चौदा, दि.१४.११.२०१८.

<u>शासन आदेश</u>

विभागीय सहायक भाषा संचालक, नवी मुंबई या दि. २७.५.२०१६ पासून रिक्त असलेल्या पदाचा अतिरिक्त कार्यभार वेळोवेळी अन्य अधिका-यांकडे सोपविला असून संदर्भ (२) नुसार तो दि. २८.०५.२०१८ च्या पुढे सहा महिन्यांकरिता पुढे सुरु ठेवण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. सदरचे पद भरण्याकरिता आवश्यक प्रक्रिया अद्याप पूर्ण झाली नसल्याने संदर्भ (३) विचारात घेऊन सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार दि. २६.११.२०१८ पासून पुढे ६ महिन्यांसाठी किंवा सदर पद भरले जाईल यापैकी जे अगोदर होईल तोपर्यंत सुरु ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

संदर्भ (४) विचारात घेऊन भाषा संचालकांनी सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार प्रचलित धोरण / मार्गदर्शक तत्त्वे विचारात घेऊन सुयोग्य अधिका-यांकडे सुपूर्द करावा.

प्रस्तुत आदेश सामान्य प्रशासन विभाग अनौ. सं.क्र. १४३०/१८/का.१२, दि. ११.१२.२०१८ व वित्त विभाग अनौ.सं.क्र. ५६१/१८/सेवा-३, दि. १०.०१.२०१९ यांअन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक **२०१९०१२२१३२७२१३४३३** असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने**,**

M. P. Kudtarkar
Digitally signed by M. P. Kudtarkar
Date: 2019.01.23 11:19:53 +05'30'

(मं.प.कुडतरकर)
कार्यासन अधिकारी

प्रति,

१) महालेखापाल- १, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
२) महालेखापाल- १, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
३) महालेखाकार (स्थानिक निवासी लेखापरीक्षा व लेखा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६) भाषा संचालक,भाषा संचालनालय,वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
७) विभागीय सहायक भाषा संचालक, नवी मुंबई.
८) सहायक भाषा संचालक (प्रशिक्षण व आस्थापना), भाषा संचालनालय.
९) श्रीमती वि.श.माळगांवकर, अधीक्षक, विभागीय कार्यालय, नवी मुंबई
१०) निवड नस्ती / आस्था-२, मराठी भाषा विभाग.